
चॅनल झी





क्यों की... मध्ये मोठी सून सविता आणि नातसून तुलसीसह

सुधा शिवपुरी: 'बा'चा बोलबाला!

क्यों *की सास भी कभी बहू थीमधील विराणी कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती 'बा' आज तुम्हा-आम्हालाही आपल्या घरातल्या आजीइतक्याच जवळच्या आणि आदरणीय वाटतात...*

□ मीरा

काही वर्षांपूर्वी टीव्हीवर *तमस* नावाची एक मालिका प्रसारित होत असे. त्यातील एक दृश्य हृदयद्रावक होतं. एक शीख महिला एका मुस्लीम मुलाला वाचवण्यासाठी नंगी तलवार हाती घेऊन उभी राहते, असं ते दृश्य होतं. ती स्त्री दुसरी-तिसरी कोणी नव्हती. आज घरोघरी आवडीने पाहिल्या जाणाऱ्या *क्यों की सास भी कभी बहू थी* या दैनंदिन मालिकेतली प्रेमळ 'बा' म्हणजेच सुधा शिवपुरी होत्या.

'खरंच. आता घरीदारी सगळीकडे मी 'बा' म्हणूनच ओळखली जातेय. माझं या मालिकेतलं अंबा लिराणी हे नाव क्वचित काही लोकांना आठवत असेल,' सुधा शिवपुरी हसत हसत सांगू लागल्या.

सुधा शिवपुरी पूर्वाश्रमीच्या सुधा शर्मा. जयपूर रेडियोवर त्यांनी अनेक मनोरंजनपर कार्यक्रम सादर केले. तिथे काम करत असतानाच त्यांना रंगभूमीविषयी आकर्षण वाटू लागलं.

'त्या ओढीमागचं खरं कारण ओम शिवपुरी होते ना?' मी चाचरत विचारले.

'अर्थातच. आमची संगत थोडी-थोडकी नव्हे, तेवीस वर्षांची होती. मला ते नेहमीच आदर्श पुरुष वाटत होते. त्यांच्या निधनानंतर आयुष्यात विचित्र पोकळी निर्माण झाली. एकाकीपणाची भावना खायला उठत असे. अशा विचित्र अस्वस्थतेत सात-आठ वर्षं काढली. ते होते तेव्हा *स्वामी*मध्ये शबानाच्या आईची आणि *हमारी बहु अलका*मध्ये बिंदियाच्या सासूची भूमिका साकारली खरी. पण त्या भूमिकांत नावीन्य म्हणून काही नव्हतंच,' 'बा' भूतकाळात रमल्या होत्या.

'तुम्ही दिल्लीच्या एन.आय.डी.मध्ये पण होतात ना?' मी बोलण्यात खंड पडू न देता विचारलं. 'मग मुंबईला कधी आलात?'

'आम्ही *दिशांतर* नावाची नाट्यसंस्था सुरू केली होती. आमच्या संस्थेने बरीच नाटकं सादर केली. त्याच सुमारास ओमजींनी *कोशीश*मधून आपल्या चित्रपट कारकीर्दीची सुरुवात केली होती. त्यानंतर त्यांना चित्रपटांचे चांगले प्रस्ताव येऊ लागले. म्हणून मग आम्ही मुंबईला येण्याचा निर्णय घेतला.'

सुधाजींना चित्रपटांत संधी मिळूनही त्या ह्या क्षेत्रात फारशा रमल्या नाहीत. 'त्याचं कारण तिथे कलाकाराला अपेक्षित असलेलं कामाचं समाधान मला मिळालं नाही. ओमजी मात्र चरित्र भूमिकांत चांगले रमले. त्यांनी फक्त चरित्र भूमिकाच नाही तर खलनायकी भूमिकाही साकारल्या. आम्ही अगदी सुखा-समाधानात होतो, पण अचानक एका रात्री काळाने ओमजींवर झडप घातली आणि मी एकाकी झाले', सुधाजींचा स्वर कातर झाला.

'ते दिवस अग्निपरीक्षा घेणारे ठरले. ओमजींच्या निधनानंतर इंडस्ट्रीत कोणीह म्हणावं तसं सहकार्य दिलं नाही. त्यावेळी रितु १५ वर्षांची तर मुलगा अवघा ११ वर्षांचा होता. मी तरी हात-पाय गाळून किती दिवस स्वस्थ बसणार? पुन्हा एकदा अभिनयाकडे वळले. सुदैवाने तेव्हा टीव्ही वाहिन्यांना बरे दिवस येऊ लागले होते. *मुजरीम हाजीर है, आ बैल मुझे मार, रजनी*मधून मी काम केलेलंच होतं. त्या जोरावर अनेक मालिका मिळाल्या *सरहदें, दामन, जय संतोषी मां, शिशे का घर, वक्त का दरिया* करत करत मी *क्यों की*...पर्यंत आले. आणि आता *सारा आकाश* ही माझी मालिकाही लवकरच छोट्या पडद्यावर दिसेल.'

मध्यंतरी *क्यों की सास भी कभी बहू थी*मधल्या त्यांच्या व्यक्तिरेखेला पूर्णविराम देण्याचा विचार चालू होता.

सुधाजींनी हसत हसत त्याचा खुलासा केला, 'खरंच. मरणासन्न बाच्या निधनाने माझा रोल संपत होता. पण लोकांनी पत्र पाठवून, फोन करून धमक्या दिल्या की 'बा'ला संपवलंत तर आम्ही *क्यों की*... बघणंच बंद करू. माझ्या चाहत्यांनीच मला मृत्यूच्या दाढेतून परत आणलं म्हणा ना', सुधाजी हसत हसत म्हणाल्या.

दर्शकच नाही तर युनिटमधले स्पॉट बॉईज, लाईटमेन, अन्य तंत्रज्ञ आणि कलाकारही



मातृत्वाचा सुखद अनुभव

*क्यों की...*मध्ये लाडका नातू मिहीरसह




त्यांना 'बा' याच नावाने हाक मारतात.

सामाजिक घटनांची झालर असलेल्या या कौटुंबिक नाट्यात तुम्ही नेमक्या कुठे रमलात?

मला इमोशनल दृश्यं अधिक आवडतात. एका प्रसंगात घरातल्या सगळ्या मुलांबरोबर मीही चित्रपटाला जायचं ठरवते. अगदी उत्साहाने ठेपले, पाण्याच्या बाटल्या अशी जंगी तयारी करते. पण तोपर्यंत सगळेजण मला न घेताच निघून गेलेले असतात. मग मी बापुजींच्या फोटोजवळ बसून खूप रडते. त्या दृश्याच्या वेळी मला खरोखरच रडू आलं. मनाचा बांध फुटला म्हणा ना. *क्यों की...*मधलं ते माझं सगळ्यात जास्त आवडतं दृश्य आहे,' सुधाजी सांगतात.

आज *क्यों की...*च्या बाची प्रतिमा



सुखी दाम्पत्यजीवनाचे क्षण

घरातल्या एखाद्या प्रेमळ वडीलधाऱ्या आजीचीच आहे. दुसऱ्या मालिकांत सुधाजी वेगळं काय करतायत?

'खरं सांगू? मला कॉमेडी खूप आवडते. *क्यों की...*मध्येही इंदुबरोबरची दृश्यं साकारताना मला मजा वाटते. ती मुलगीही तशीच चंचल आणि बडबडी आहे. तिच्याबरोबर मी एक ॲडफिल्मही केली. *कल आज और कल*मध्ये तुलसीच्या सासूची विनोदी भूमिका साकारली. थोडक्यात, सध्याच्या कामावर मी खूश आहे. माझी मुलगी रितु लग्न करून संसाराला लागलीय तर मुलगा दिग्दर्शनाकडे वळलाय. प्रत्येकाच्या आयुष्यात एन्ट्री आणि एक्झिट आहेच. आपला रोल अर्धवट तर सोडता येत नाही ना?'

या एका वाक्यात सुधाजींनी जीवनाचं मर्मच सांगितलं नाही का?



इंटरनॅशनल दादी इंदुबेन मेहता

***क्यों** की सास भी कभी बहू थी*मधून वयाच्या ६८व्या वर्षी अभिनयासारख्या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या इंदुबेन मेहता अर्थात 'जुनागढवाली दादी' आपल्या अनोख्या शैलीने दर्शकांना हसवतात तेव्हा...

□ रेखा खान

क्यों *की...*मुळे घराघरात लोकप्रिय झालेली जुनागढची बहिरी दादी म्हणजे इंदुबेन मेहता. तुलसी, मिहीर, पायल, बा वगैरे मंडळींप्रमाणे ही दादीही दर्शकांच्या कुटुंबातलीच एक झाली आहे म्हणा ना! गमतीची बाब म्हणजे बहिऱ्या आजीचा अभिनय करणाऱ्या गोदावरी दादी ऊर्फ इंदुबेनची ही पहिलीच मालिका. तरीही त्या कॅमेऱ्यासमोर एखाद्या सराईत कलाकाराप्रमाणे वावरताना पाहून आश्चर्य वाटलं ना? अभिनयाचा 'अ' माहीत नसलेल्या इंदुबेनना *क्यों की...*च्या या व्यक्तिरेखेने इतकी लोकप्रियता मिळवून दिली की आता त्या *कहेवु पडे* या गुजराती मालिकेत, बबूल च्युइंगमच्या जाहिरातीतूनही दिसू लागल्या आहेत. इतकंच नाही तर स्टार प्लसवरील *खिचडी* या विनोदी मालिकेतूनही इंदुबेन लवकरच पुन्हा आपल्यासमोर येणार आहेत.

आपल्या कौटुंबिक पार्श्वभूमीविषयी माहिती देताना इंदुबेन म्हणतात, 'सौराष्ट्रातील महुवा हे आमचं मूळ गाव असलं तरी मी स्वतःला मुंबईचीच मानते. आई-वडिलांची मी एकुलती एक मुलगी. त्या काळी एका भरल्या घरी मी लग्न करून गेले. कौटुंबिक कर्तव्य पार पाडत असतानाच घरातल्या मुलांच्या अभ्यासाकडेही मी लक्ष देत असे. शिवणकाम, वीणकाम, भरतकाम या कलांमध्येही मला चांगली गती होती. पण अभिनयाचा विचार कधी स्वप्नातही केला नव्हता.'